# पंडित नेहरुचे लोकशाही विषयक विचार

**प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील,** शंकरराव जगताप आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली ता.कोरेगाव, जि.सातारा

**प्रस्तावना** :

पंडित नेहरु इंग्लडमध्ये शिक्षणासाठी राहत असताना तेथील उदारमतवादाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. व्यक्ति स्वातंत्र्याचे महत्व त्यांनी आपल्या Unity of Indiaया ग्रंथातून मांडले आहे. पंडित नेहरुंच्या अढळ श्रध्देचे मूळ त्यांच्या मानवतावादात दिसून येते. लोकशाही विचार हाच मानवतावादी विचार आहे. ख–या समस्या व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंधातूनच उद्‌भवलेल्या असतात.

- **लोकशाहीची संकल्पना**

लोकशाही विषयी नेहरु म्हणतात की व्यक्तीच्या विकासासाठी पुरेपुर संधी उपलब्ध करुन देणारा चैतन्यमय समाज असा त्यांचा लोकशाहीचा अर्थ आहे. भारतीय जनतेला समता, न्याय व शोषणमुक्ती प्राप्त करुन देऊन तिच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारी प्रणाली असा अर्थ ते घेतात. सत्तेतील वरिष्ठ लोक बदलणे एवढाच त्यांचा हेतू नव्हता तर जनतेचे राज्य आणणे हा हेतू होता. जनतेचे दारिद्रय व व दुःख यांचे निवारण करणे हा हेतू होता.

भारताला स्वांतत्र्य मिळाल्यानंतर अनेक जटील समस्या होत्या. अनेक मतभेद होते. लोकामध्ये निरक्षरता, देशात पायाभूत सुविधा नव्हत्या. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे संबंध प्रस्थापित करणे ,शेतीमध्ये व उद्योग धंदयामध्ये सुधारणा करणे शिक्षणा सारख्या क्षेत्रात प्रगती करणे अशा अनेक समस्याचे आव्हान होते. सर्वांना एकत्र घेऊन समस्यांचा मुकाबला कसा करायचा हा महत्वाचा प्रश्न होता. सामान्य माणसाला विश्वासात घेऊन त्यांच्या मनात आपण या राष्ट्राचे जबाबदार घटक आहोत . सत्तेचे , उद्योगधंदयाचे व प्रत्येक उत्पादन कार्याचे भागीदार आहोत अशी जाणीव निर्माण केली पाहिजे. हेच नेहरुंना भारतीय लोकशाहीत निर्माण करावयाचे होते.

महात्मा गांधीजीच्या आदर्श लोकशाहीपेक्षा पाश्चात्य लोकशाही आदर्शांच्या जवळ नेहरुंची लोकशाही संकल्पना जाते. लोकशाही यशस्वी करण्यासाठी आर्थिक गोष्टीचे न्याय विभाजन झाले पाहिजे असे नेहरुंचे मत होते. 'लोकशाहीला इतके दिवस अपयश पत्करावे लागले याचे कारण तिने आवश्यक तेवढी मजल मारली नाही . ती पुरेशी लोकसत्ताक झाली नाही. कारण आर्थिक लोकसत्ता निर्माण करण्याचे काम तिने बजावले नाही. तिची कार्यपध्दतीदेखील भारी, अवजड व संथ व त्वरित संक्रमणाच्या काळास अनुरुप अशी बनून राहिली होती'[1]

1938 पर्यंत कॉंग्रेसचे धोरण संस्थानांच्या कारभारात ढवळाढवळ न करण्याचे होते परंतु नेहरुना असे वाटत असे की संस्थानातील प्रजेत राजकीय जागृती व्हावी त्यांनी लोकशाही तत्वाला अनुसरुन जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करावी यासाठी त्यांनी 'All India states people conference 'नावाची संघटना त्यासाठी स्थापन केली. स्वांतत्र चळवळीचा विचार संस्थानात पसरावा त्यासाठी ही चळवळ शक्तीशाली व्हावी हा उद्‌देश होता. त्याचबरोबर संस्थानिकांची मनमानी कारभार थांबावा व जनतेला आपल्या हक्कांची जाणीव व्हावी हा नेहरुंचा उद्‌देश होता. नेहरुंनी स्वातंत्र्यापूर्वी पासूनच भारतात लोकशाही रुजवण्याचे काम सुरु केले होते. स्वातंत्र्यापूर्वी भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर साम्राज्यशाही व हुकुमशाही विरोधी राष्ट्र व लोकशाहीचे समर्थन करणारे राष्ट्र अशी प्रतिमा निर्माण करण्यात नेहरुंचे मोठे योगदान आहे. भारतासहीत जगात लोकशाही रुजावी यासाठी नेहरु सातत्याने प्रयत्न करत. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही साम्राज्यवाद व वसाहतवाद विरोधी आहे. भारतीय स्वातंत्र चळवळीला इतर पारतंत्र्यात असलेल्या देशांनी मदत केली पाहिजे कारण त्यातूनच साम्राज्यशाही खंडित होईल असे विचार त्यांनी मांडले. भांडवलशाहीवर आधारीत लोकशाही त्यांना मान्य नव्हती.

'भारतासाठी लोकशाहीला पर्याय नाही याबद्‌दल त्यांच्या मनात संदेह नव्हता लोकशाहीच्या विरोधकांशी त्यांचे कधीच सूत जमणे शक्य नव्हते फासिस्टवाद व नाझीवाद यांचे तर ते कट्‌टे विरोधक होते. किंबहूना या प्रणालीचे परिणाम पाहुनच त्यांच्या लोकशाही विचारांना बळकटी आली होती. मुसोलिनीने व नाझी शासनाने त्यांना भेटीचे निमंत्रण दिले असता ते त्यांनी साभार नाकारले होते'[2] लोकशाही विरोधी राजवटींना नेहरुंचा विरोध होता. साम्यवादीनी मानवी स्वातंत्र्याची केलेली मुस्कटदाबी यावरही नेहरुंनी टिका केली. 1929 नंतर ते रशियाला गेल्यानंतर तेथील विचारांनी प्रभावित झाले. त्यामुळे मार्क्स, लेनिन, रशिया यांच्याबद्‌दल त्यांनी आदर बाळगला. साम्यवादातील चांगल्या विचारांचा पुरस्कार करुन भारतीय लोकशाहीत रुजवण्याचा प्रयत्न केला. साम्यवादी विचारांचा पुरस्कार करताना लोकशाही निष्ठेला त्यांनी कधीही बांधा येऊ दिली नाही. लोकशाहीत मताधिकार शिक्षण अशा महत्वाच्या अधिकारावर कोणतेही बंधन असू नये असे त्यांचे मत होते. संकुचित मताधिकारापेक्षा व्यापक मताधिकार इष्ट असे त्यांना वाटत होते. 'संपत्तीची पात्रता मताधिकारासाठी लावणे त्यांना कोणत्याच दृष्टीने उचित वाटत नाही. शिक्षणाची अट उचित असली तरी रस्त्यावरच्या अडाणी सारासार बुध्दी असलेल्या माणसापेक्षा सुशिक्षित माणसाच्या मताला जास्त महत्व का द्यावे हे त्यांना पटत नाही' [3]

सार्वत्रिक मताधिकार हा विशिष्ट वर्गाच्या मक्तेदारीपासून देशाला वाचवतो. मूठभर लोकांच्या हक्कापेक्षा नेहरुना असंख्य लोकांचे कुशासन महत्वाचे वाटते. परकीयांच्या गुलामगिरीपेक्षा स्वयकीयांचा राज्यकारभार कधीही चांगला असे नेहरुंना वाटते. शासन व जनता यांच्यातील सुसंवादावरच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते आपल्या इच्छेनुसार शासनाचा कारभार चालतो असा विश्वास लोकशाहीत निर्माण झाला पाहिजे.

'जिला नेहरु परिपूर्ण लोकशाही असे संबोधताना दिसतात त्यात राजकीय स्वांतत्र्य, समता व शांततापूर्ण मार्गानी प्रगती या तत्वांचा विनाव्यत्यय विकास त्यांना अभिप्रेत आहे. केवळ सर्वांना सारखाच मतदानाचा हक्क दिल्याने समाजात समता प्रस्थापित होऊ शकेल असे त्यांना वाटत नाही. समान मताधिकाराने भिकारी व लक्षाधीश समान होत नाहीत. प्रभाव टाकण्याची जी असंख्य साधने लक्षाधीशाला सुलभ असतात ती भिका–याला कधीच लाभू शकत नाहीत. त्यामुळे केवळ पाश्चात्य लोकशाही संस्थांचे अनुकरण करुन भारतात लोकशाही आणता येणार नाही याची नेहरुंना पुरेपुर कल्पना होती'[4]पंडित नेहरुंनी लोकशाही यशस्वीसाठी व देशातील जनतेचे विविध प्रश्न सरकारपुढे मांडण्यासाठी विविध राजकीय पक्ष असले पाहिजेत असे त्यांचे मत

होते. राजकीय पक्षामुळे प्रत्येक प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन मांडला जातो. लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्यासाठी प्रभावी विरोधी पक्ष असणे महत्वाचे आहे. तरच जनतेचे प्रश्न सोडवले जातील.

'भारत स्वातंत्र्याच्या उंबरठयावर असताना कॉग्रेस पक्षाचे विसर्जन करावे अथवा त्या संघटनेने लोकसेवा संघाचे रुप धारण करावे असे गांधीनी सुचवले होतं. नेहरुंनी व कॉग्रेसच्या ज्येष्ठ पुढा–यांनी त्या सूचनेचा स्वीकार केला नव्हता '[5] वरील विश्लेषणावरुन असे म्हणता येईल की भारतीय लोकशाहीच्या स्थैर्याच्या दृष्टीने स्वतंत्र भारतात ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत एका सुसंघटीत पक्षाची आवश्यकता होती. त्या कालखंडात कॉग्रेस हा एकमेव संघटीत पक्ष होता. भारताच्या विकासासाठी या पक्षाचे मोठे योगदान आहे त्यामुळे नेहरु व त्यांच्या सहकार्याचा निर्णय योग्य होता असे म्हणता येईल.

लोकशाहीच्या अन्य प्रकारापेक्षा संसदीय लोकशाही हा प्रकार भारतासाठी सर्वोत्तम वाटतो. कारण भारतातील विविधतेतून एकता निर्माण करण्यास संसदीय लोकशाही योग्य पर्याय आहे. मानवी इतिहासाचे मूळ सूत्र प्रगती हे आहे ते संसदीय व्यवस्थेत उत्तम प्रकारे साध्य होऊ शकते. भारतासारख्या देशात अनेक वर्षे विकास खुटलेल्या समाजाला प्रगतीची व परीवर्तनाची गरज मोठी आहे. लोकशाही विचारांनी आपण ती सोडवू शकतो याबद्दल नेहरुंना विश्वास होता. 'सुप्रसिध्द तत्ववेत्ते व लेखक बर्ट्रंड रसेल नेहरुबद्दल बोलताना असं म्हणाले होते की मी नेहरुंना एक थोर नेता मानतो कारण हुकूमशहा बनण्याकरता लागणारी अफाट लोकप्रियता त्यांना लाभलेली असतानाही त्यांनी लोकशाहीचाच मार्ग स्वीकारला. पुढे ते असेही म्हणाले की भारताची प्रगती लोकाशाहीद्वारा साधण्यातच भारताचे कल्याण आहे. हे समजण्याकरता लागणारे शहाणपण व ऐतिहासिक दृष्टी नेहरुंमध्ये आहे व त्यामुळेच मी त्यांना एक द्रष्टा पुरुष मानतो'[6]

- **सारांश –**

भारतीय समाजात मोठया प्रमाणात असणारी निरक्षरता, लोकामध्ये असणा–या प्रथा परंपरा, जातीयता, धर्माधता, अंधश्रध्दा, भाषेची विविधता, भौगोलिक विविधता यातून प्रगती करण्याचा एकमेव मार्ग हा लोकशाही आहे. याबद्दल नेहरुंना विश्वास होता. धर्मनिरपेक्षतेचा पाया मजबूत करणे देशातील जुन्या व योग्य परंपराचा मान राखणं , देशाला विज्ञानिष्ठ बनविणं, देशाची आर्थिक , सामाजिक व सांस्कृतिक प्रगती ही लोकशाही मार्गाने होऊ शकते. हे नेहरुंना भारताच्या अभ्यासातूनच लक्षात आलेले होते. लोकशाही मार्ग हा त्वरित प्रगतीचा मार्ग नसला तरीही मानवी मूल्यांची पायमल्ली होऊ न देता, प्रगती करण्याचा तो एकमेव मार्ग आहे अशी नेहरुंची श्रध्दा होती.

- **संदर्भ –**

1. भोळे भा.ल. : आधुनिक भारतातील राजकीय विचार पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिकर्स, नागपूर जून 2003 पृ. क्र.749
2. उपरोक्त : पृ. क्र.749
3. उपरोक्त : पृ. क्र.750
4. उपरोक्त : पृ. क्र.749
5. चौसाळकर अशोक (संपा) : समाज प्रबोधन पत्रिका , प्रकाशक, विलास वाघ पुणे पृ.15
6. उपरोक्त : पृ. 15

- **संदर्भ ग्रंथ –**

1. भोळे भा.ल. : आधुनिक भारतातील राजकीय विचार पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिकर्स, नागपूर जून 2003
2. ढोबळे रमेश : आधुनिक भारतीय राजकीय विचार विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगापुरा , औरंगाबाद , जून 2010
3. अवरथी उमरेश्वर , अवस्थी राजकुमार : प्रतिनिधी भारतीय राजनीतिक चिन्तक रिसर्च पब्लिकेशन्स,जयपूर 2009
4. चौसाळकर अशोक (संपा): समाज प्रबोधन पत्रिका , प्रकाशक, विलास वाघ ,पुणे, डिसेंबर 2014